**(REVISED COURSE)** **QP Code : BH-3875**

(3 Hours) **[Total Marks : 100**

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(२) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.

१. (अ) साहित्यप्रकारांच्या वर्गीकरणामागील मूलभूत तत्त्वे सांगून एकसत्त्ववादी आणि नाममात्रवादी भूमिकांचा परामर्श घ्या.

**किंवा**

(ब) कथा या साहित्यप्रकाराच्या 'पात्रचित्रण' व 'अवकाश' या घटकांचे स्वरूप सविस्तर स्पष्ट करा.

२. (अ) हताश, निराश, पराभूत आणि मनोविकृत माणसांचे चित्रण, हे पात्रस्वरूप जी. ए. कुलकर्णी यांच्या 'रक्तचंदन' मधून कशाप्रकारे दिसते ते साधार सांगा.

**किंवा**

(ब) 'माणसांच्या जीवनातील एकाकीपणाची तीव्र जाणीव दिवाकर कृष्णांच्या कथेतून सशक्तपणे चित्रित झाली आहे' 'समाधी आणि सहागोष्टी' च्या आधारे सोदाहरण स्पष्ट करा.

३. (अ) 'सामाजिक विषमतेची जाणीव हे बाबुराव बागूलांच्या कथाशयाचे प्रमुख केंद्र आहे' हे विधान जेव्हा 'मी जात चोरली होती' या कथासंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) गौरी देशपांडे यांच्या कथामधील काळ आणि भाषा या घटकांची चर्चा 'आहे हे असं आहे' च्या आधारे करा.

४. (अ) फॅन्टसी आणि चिंतनशीलता यांचा एकात्म प्रत्यय गंगाधर गाडगीळांच्या कथेतून प्रत्ययाला येतो. 'निवडक कथा' च्या आधारे या विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

(ब) 'कथात्म साहित्यातील वास्तव' या संदर्भात कमल देसाई यांच्या कथांमधील वास्तवाची वैशिष्ट्ये साधार लिहा.

५. (अ) 'ग्रामीण माणसांची बदलती मानसिकता हे 'ढग' आणि 'आलोक' या कथासंग्रहाच्या आशयाचे प्रमुख केंद्र आहे' या विधानाची सत्यता साधार लिहा.

**किंवा**

(ब) खालीलपैकी कोणत्याही **दोन** टिपा लिहा :-
(१) कथात्म साहित्यातील निवेदन
(२) गंगाधर गाडगीळांच्या कथेतील बालभावविश्व
(३) जी. ए. च्या कथामधील प्रतीकात्मकता.

---